★★★ सद्रक्षणाय खलनिग्रहणाय ★★★

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल




# महिला सुरक्षेची

# दशसुत्रे

संकल्पना

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलडाणा

☆☆☆ सद्रक्षणाय खलनिग्रहणाय ☆☆☆

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

# महिला सुरक्षेची दशसुत्रे



संकल्पना

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलडाणा




**प्रकाशक**

पोलीस अधीक्षक,
बुलडाणा जिल्हा पोलीस दल,
बुलडाणा

**मुद्रणस्थळ**

**सौ.रागिणी अभय शास्त्री**
ओंकार ग्राफिक्स ॲण्ड पब्लिकेशन
कृष्णा, शास्त्री मोहल्ला, जालना
मो. ९८२२७५०२६, ८००७१७०८०८

**जनहितार्थ विनामुल्य वितरित**

ही पुस्तिका केवळ एक संदर्भ पुस्तिका असून यातील मजकूर कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात जशाचा तसा ग्राह्य नाही त्याकरिता संबंधीत पुस्तकाचा / शासन निर्णयाचा संदर्भ घेण्यात यावा.

# मनोगत



अरविंद चावरिया

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता असे म्हणत स्त्रीला देवत्व देऊन तिचे माणूसपण हिरावून घेता येणार नाही. हे आता आपल्या समाजात खोलवर रुजवणे आवश्यक आहे. स्त्रीवर अत्याचार करत सहज तिला वश करता येईल, हा गैरसमज खोडून काढत अशा मनोवृत्तीच्या लोकांना आळा घालणे आज अत्यंत गरजेचे झाले आहे.

दुसरा तितकाच महत्वाचा मुद्दा म्हणजे स्त्रियांनी आपला मानसन्मान आणि सुरक्षितता याबद्दल स्वतःच जागरूक, सतर्क आणि संघर्षाला तयार राहणे तितकेच आवश्यक आहे. जो स्वतःची मदत करू शकत नाही त्याची मदत बाकीचे कसे करतील. त्यामुळे आधी आपणच आपली मदत केली पाहिजे आणि योग्य संधी मिळताच इतरांना मदतीची हाक दिली पाहिजे.

या दृष्टीने महिलांनी सतर्कता बाळगणे, आत्मविश्वासाने आणि निर्भीडपणे संकटाला सामोरे जाणे, प्रसंगावधान राखून वागणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना मार्गदर्शक आणि सहायक ठरतील अशा गोष्टी, उपाय तसेच संरक्षक सूचना देण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

अगदी सोप्या भाषेत अगदी सोप्या सूचना आणि युक्त्या दिल्या आहेत, ज्यामहिलांनी स्वतः लक्षात ठेवाव्याच पण आपल्या मुली, सुना, मैत्रिणी, शेजारणी व ओळखीच्या महिलांना सुद्धा सांगाव्या आणि याचा प्रचार प्रसार करण्यास सांगावे.


आत्मविश्वास आणि समयसूचकता ही दोन मोठी शस्त्रे आहेत हे ध्यानात ठेवा.

**अरविंद चावरिया**
पोलीस अधीक्षक, बुलडाणा

# महिला सुरक्षेची दशसूत्रे

**बुद्धिमान व्यक्ती एखाद्या अडचणीच्या परिस्थितीतून बाहेर कसे पडायचे ते जाणते. मात्र चतुर व्यक्ती हे जाणते की अडचणीच्या परिस्थितीत मुळात सापडायचेच नाही.**

## पहिले सूत्र - संकट ओळखणे




**काही गोष्टी अशा आहेत ज्या एकाच वेळी घडत असल्या, तर संकट येणार हे लक्षात ठेवा.**

### पहिली गोष्ट

अशी की, हल्ला करू शकणाऱ्या व्यक्तीला तिची शारीरिक क्षमता, त्यांची एकूण संख्या आणि जवळ असलेली शस्त्रे यामुळे हल्ला करण्याचा **आत्मविश्वास** असणे.

### दुसरी गोष्ट

अशी की, जागा आणि परिस्थिती तुमच्यावर हल्ला करणाऱ्यासाठी **अनुकूल** असणे.

### तिसरी गोष्ट

अशी की, त्या व्यक्तीचा हेतू चांगला नसणे आणि त्याचा **अंदाज** लावता न येणे.

ज्या क्षणी तुम्हाला जाणवेल की या तीनही गोष्टी एकत्र येत आहेत, त्याक्षणी तुम्ही एखाद्या विश्वासू व्यक्तीला सोबत घेऊन, तात्काळ ती जागा सोडा.

जर तुम्ही तिथून निघून जाऊ शकत नसाल, तर मदतीसाठी फोन करा, आपल्या जवळच्या व्यक्तींना तुम्ही कोठे आहात ते सांगा त्यांना परिस्थितीची कल्पना द्या. दारुडे, अमली पदार्थाच्या नशेत असणाऱ्या किंवा लैंगिक विकृती असणाऱ्या व्यक्ती, भावनिकदृष्ट्या ज्यांच्या वर्तनाचा अंदाज लावता येत नाही अशा व्यक्ती यांच्यापासून नेहमी दूर रहा.

**जर तुम्हाला काही धोकादायक सवयी असतील तर तुम्ही विश्वासू मित्रा बरोबर किंवा अन्य भरवश्याच्या व्यक्तीसोबत रहा.**

## दुसरे सूत्र - तुमच्या घरातील सुरक्षा

तुमच्या पर्यंत कोणी पोहचता कामा नये. आपण स्वतः सावज / लक्ष्य होण्यापासून कसे वाचता येईल ते पाहू.



- *घरात असताना तुमच्यापर्यंत येण्यासाठीचा सहज प्रवेश रोखा.*

  घरात असताना दारे आणि खिडक्या पूर्णपणे बंद ठेवा. खिडक्यांचे पट दुहेरी असावेत, जेणेकरून तुम्ही बाहेर कोण आहे ते पाहू शकाल. मुख्य दरवाजा सोबतच बाहेरच्या बाजूने एक लोखंडी जाळीचा दरवाजा असणे सुरक्षित ठरेल.

- *जर तुम्ही नेहमीच घरी एकट्या राहत असाल.*
  - धोक्याची घंटा वाजवून इतरांना मदतीसाठी बोलावण्याकरिता एखादी अलार्म यंत्रणा घरात बसवा.
  - एखादा चांगला कुत्रा पाळा.
  - अंगणातली झाडे झुडपे नीट कापत रहा,जेणेकरून त्यांचा आडोसा घेत कोणी लपून राहू शकणार नाही.
  - खिडक्यांना पडदे हवेतच, त्यामुळे कोणीही सहज आत कोण आहे, आतली रचना कशी आहे ते पाहू शकणार नाही.
  - एकट्याने कार चालवत असाल तर सगळी दारे आणि खिडक्यांच्या काचा बंद ठेवा.

- *ऑनलाईन राहतांना अतीप्रमाणात व्यक्त होत खासगी माहिती सांगू नका*
  - फेसबुक सारख्या सोशल मीडियाचा वापर करतांना प्रायव्हसी सेटिंग्ज वापरून तुमच्याबद्दल खासगी माहिती उघड होण्यास प्रतिबंध घाला.



  - वैयक्तिक माहिती व कौटुंबिक खासगी घडामोडी सांगू नका.
  - तुमचे फोटो कोणालाही दिसतील असे सेटिंग्ज ठेवू नका.
  - संगणक हॅकिंग सारखे प्रकार टाळण्यासाठी चांगले आणि वैध एन्टी व्हायरस वापरा.

- लक्षात ठेवा गुन्हेगार नेहमी त्याची खरी ओळख लपवतात आणि तुम्ही असुरक्षित स्थितीत असण्याची बाब उघड करताच, विशेषतः तुम्ही एकट्या आणि घाबरलेल्या स्थितीत आहात हे पाहताच, ते त्या परिस्थितीचा फायदा घेतात.

## तिसरे सूत्र

## - असुरक्षित असल्याचे वागण्यातून दिसू देऊ नका.

### माझ्या वाटेला जाऊ नका असा संदेश कसा देणार?




- ***तुम्हाला सहज लक्ष्य (सावज) केले जाऊ शकेल असे वर्तन ठेवू नका.***

जसे की आपण दूरचित्रवाणीचाच्या कार्यक्रमात पाहतो, हल्लेखोर नेहमी त्यांच्यासाठी सर्वात सोपा असणारा मार्ग अवलंबतो.त्यामुळे आपण सहज लक्ष्य होऊ शकतो असे वाटण्यासारखे आपले वागणे ठेऊ नका,जेणेकरून हल्लेखोर तुम्हाला त्याचे सावज म्हणून निवडू शकणार नाही.

हे लक्षात ठेवा की गुन्हेगाराला त्याचा हेतू साध्य करतांना गडबड गोधळ होऊ द्यायचा नसतो. आवाज शक्यतो होऊ द्यायचा नसतो. त्यामुळे त्याला जर वाटले की तुम्ही विरोध करणार आहात आणि बराच वेळ संघर्ष होऊ शकतो,तर त्याचे तुमच्यात स्वारस्य उरणार नाही आणि तो निघून जाईल.





- ***आत्मविश्वासपूर्ण देहबोली समजून घ्या.***
  - खांदे पाडून राहू नका,ते सरळ ठेवा आणि ताठपणे चाला.
  - भांबावल्यासारखे वागू नका, तुम्ही संभ्रमात पडला असाल किंवा रस्ता चुकला असाल तर तसे दिसू देऊ नका. प्रसंगावधान ठेवा.

- ***नजरेचा अंदाज***
  - आत्मविश्वासाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आपली नजर, समोरच्याकडे थेट पहा मात्र टक लावून पाहणे टाळा.
  - याचा आणखी एक फायदा म्हणजे आपल्याकडून एक इशारा दिला जातो.कारण गुन्हेगार सतत डोळ्यात डोळे घालून पाहणे टाळत असतो.
  - मात्र त्याच बरोबर हे सुद्धा लक्षात ठेवा की अतिआत्मविश्वास पण घातक ठरू शकतो आणि त्यामुळे काही अविचाराने कृती करू नका.

**आत्मविश्वासपूर्ण चाल + ताठ पाठ + नजर थेट सरळ = आत्मविश्वास**

## चौथे सूत्र

## - तुमच्या आजूबाजूला लक्ष ठेवा.

**धोक्याची पावले आधीच कशी ओळखावीत?**
**आसपासचे लोक आणि त्यांच्या वर्तनाबाबत सजग रहा.**



***जर नेहमीपेक्षा काही वेगळे घडत असेल तर तुम्ही तात्काळ सतर्क झाले पाहिजे.*** **- जसे की**

- निर्मनुष्य रस्त्यावर एखादी कार उभी आहे आणि आत लोक बसलेले आहेत.
- किंवा दुचाकींवर आपली ओळख लपवत हेल्मेट घालून काही लोक थांबलेले आहेत, अशा वेळी तुम्ही रस्ता बदलून दुसरीकडून जा.
- आपले वाहन बिघडलेले आहे त्यामुळे आपण थांबलो आहोत असे नाटक ते करत असल्याचीही शक्यता असते.

***मोबाईल फोन आणि आय पॉडस***



- रस्त्याने जाताना आपल्या मोबाईलमध्ये गुंग होऊन किंवा आयपॉड मध्ये गाणी ऐकत बेभान चालत आजूबाजूच्या जगाकडे दुर्लक्ष करू नका.
- जर तुम्हाला लक्ष्य केले गेले तर अचानक तुम्हाला काहीही कळणार नाही आणि काही करताही येणार नाही.

***पुरुष तुमच्यासोबत एकटे राहण्याच्या संधी निर्माण करतात का?***

- कामाच्या ठिकाणी असे नेहमी घडते आणि त्याबद्दल तुम्ही स्पष्ट जाब विचारू शकत नाही. अशा वेळी किमान तुमच्या मित्रमंडळींना, हितचिंतकांना तुम्हाला वाटणाऱ्या संभाव्य धोक्याची कल्पना द्या आणि त्यांना तुमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी सांगा.

**नेहमीपेक्षा वेगळे वर्तन लक्षात घ्या आणि सजग रहा.**

पाचवे सूत्र

## धोका असल्याचे जाणवताच त्याला तोंड देण्याची किंवा तिथून निसटून जाण्याची तयारी करा.



### *संकटकाळी गोंधळून न जाता प्रसंगावधान कसे राखावे.*

- तुम्हाला अस्वस्थ करणारी काही चाहूल लागताच आपल्या आतल्या आवाजाकडे लक्ष द्या आणि मनाचा कौल घ्या.
- आपल्या स्वाभाविक अंतःप्रेरणेकडे दुर्लक्ष करू नका. एखादी परिस्थिती किंवा व्यक्ती तुम्हाला अस्वस्थ करत असेल तर तात्काळ ती जागा सोडून जा.
- एखाद्या व्यक्तीचे वागणे खूपच चांगले असेल मात्र तिचे हसणे कृत्रिम असेल आणि डोळ्याला भिडत नसेल तर तुम्ही लगेच सतर्क झाले पाहिजे.



### *शंका वाटली तर थोडे कडक वागा.*

- एखादी व्यक्ती चांगले असल्याचे ढोंग करत असेल आणि काहीतरी गडबड असल्याचे तुम्हाला नक्कीच जाणवत असेल तर तुम्ही चांगलेच वागले पाहिजे असे काही बंधनकारक नाही.
- जर तुम्हाला कडकपणे वागणे, बोलणे जमत नसेल तर एखादा फोन आल्याचे नाटक करत तिथून लवकरात लवकर निघून जा.

### *कोणाच्या चांगल्या दिसण्याला फसू नका.*

- एक गोष्ट नेहमी गृहीत धरली जाते की गुन्हेगार हे वेगळेच, गुन्हेगारांसारखे असे विशिष्ट प्रकारचे दिसत असतील. वास्तविक अनेक खूनी, बलात्कारी आणि बाल लैंगिक शोषण करणारे अगदी सभ्य आणि मित्रत्वाने वागणारे होते.
- लक्षात ठेवा दुसऱ्यांना मूर्ख बनवून फसवण्यासाठी हे गुन्हेगार लोक फार चांगला अभिनय करतात. ते खोटे बोलण्यात अगदी पटाईत असतात.

## सहावे सूत्र

### शाब्दिक आणि देहबोली ठामपणा दाखवणारी असावी.



### संदिग्ध वागणे टाळावे

- एका ठराविक अंतरापेक्षा जवळ कोणत्याही अनोळखी व्यक्तीला येऊ देऊ नका
- अनोळखी व्यक्ती आणि तुमच्यातील अंतर कमी होऊ देऊ नका.
- एखादा पत्ता विचारण्याच्या बहाण्याने जवळ येणे ही नेहमी वापरली जाणारी युक्ती आहे. हे लक्षात ठेवून अशा वेळी सावध रहा.
- जर एकट्या असाल तर अनोळखी व्यक्तीला स्पष्ट शब्दात सुनवा की, " दूर रहा आणि काय विचारायचे ते दुरुन विचार"

### अचानक होणारा हल्ला कसा टाळता येईल?

- एखादी व्यक्ती चांगले असल्याचे ढोंग करत असेल आणि काहीतरी गडबड असल्याचे तुम्हाला नक्कीच जाणवत असेल तर तुम्ही चांगलेच वागले पाहिजे असे काही बंधनकारक नाही.

### स्पष्ट आणि ठाम पणे बोला

- दारू प्यालेल्या आणि लैंगिकवृत्ती चाळवलेल्या माणसांना सूचक बोलणे कळत नाही.
- स्पष्टपणे सांगा की तुम्हाला त्याचे वागणे आवडत नाही.
- हे तरुण मुलींना समजावून सांगा कारण एखादी परिचित व्यक्ती गलिच्छ किंवा चुकीचे वागत असेल तर काय करावे, कसे वागावे हे त्यांच्या लक्षात येत नाही.
- लहान मुलांना वाईट स्पर्श ओळखण्यास शिकवावे आणि त्याबद्दल तात्काळ घरी आई वडिलांना,कुटुंबातील इतर वडीलधाऱ्या व्यक्तींना सांगण्यास शिकवावे.

**आपले बोलणे स्पष्ट, नेमके आणि ठाम असू द्या.**

## सातवे सूत्र - पळा जोरात पळा

### जितक्या वेगाने शक्य असेल तेव्हढ्या वेगाने पळा!



- अनेकांना वाटेल की यात काय असा मोलाचा सल्ला आहे. पण खरी गोष्ट अशी की संकटात किंवा धक्का बसलेल्या स्थितीत अनेक जण इतके बेसावध असतात की त्यांना हे सुद्धा ऐनवेळी सुचत नाही, त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे.
- पळत गर्दीच्या ठिकाणी जा.

● *त्या व्यक्तीला तुमचा पाठलाग सहज करता येणार नाही असे पाहा.*

- शक्य असल्यास दिशा बदलात पळा जेणे करून दारुड्या माणसाला ते समजणे आणि तसा पाठलाग करणे अवघड जाईल. भराभर दिशा बदला.
- हल्लेखोर पाठलाग करतांना त्याच्या रस्त्यात जास्तीत जास्त अडथळे निर्माण करा.

● *शक्य तितक्या लवकर मदत बोलवा*

- मिळालेल्या पहिल्या संधीत आपल्याला संकटात मदत करू शकतील अशा व्यक्तींना तात्काळ फोन करा.
- तुमच्या सवयी किंवा कामाची वेळ यामुळे तुम्हाला असा धोका अधिक असल्यास आपत्कालीन मदतीचे ( इमर्जन्सी ) फोन क्रमांक फास्ट डायलवर ठेवा.

**धोक्याच्या स्थितीपासून अंतर वाढवत गर्दीच्या ठिकाणी वेगाने जा.**

# आठवे सूत्र

## - लोकांचे लक्ष वेधून घ्या

### संकटात सापडल्यावर आजूबाजूच्या लोकांचे लक्ष वेधून घ्या



- *तुमच्या भोवतीच्या लोकांपर्यंत तुम्ही संकटात असल्याचे पोहोचवा.*

  - साधारणपणे एखादे भांडण किंवा तत्सम घटना पाहिल्यावर काय करावे या बाबत लोकसुद्धा संभ्रमात पडतात.

- *स्पष्ट मदत मागा.*

  - आजूबाजूच्या लोकांना आपोआप समजेल आणि ते मदत करतील असे गृहीत धरू नका.

  - समस्या अशी असते की अनेकजण भीतीने मोठ्याने ओरडू शकत नाहीत. सर्वात सोपा उपाय म्हणजे छोटे छोटे पण स्पष्ट कल्पना देणारे शब्द सतत उच्चारत ओरडण्याचा प्रयत्न करत राहा जसे की, -**जा जा, दूर जा, वाचवा वाचवा वगैरे**

- *मुलांना शिकवा*

  - अनोळखी किंवा कोणतीही व्यक्ती त्रास देत असल्यास लगेच वाचवा वाचवा असे मोठ्याने ओरडण्यास सांगा.

  - मुलांना पालकांचे नांव. पत्ता, फोन क्रमांक लक्षात ठेवण्यास शिकवा, पाठ करून घ्या.

  - त्रास देणाऱ्या व्यक्तीने अडवून, पकडून ठेवल्यास त्या व्यक्तीच्या हाताला चावा घेऊन पळून जाण्याचे सांगून ठेवा.

  - मोठ्याने सतत ओरडा, वेगाने पळा, तुम्ही संकटात असल्याचे लोकांना कळेल असे करा.

# नववे सूत्र - निर्भीड दिसा

## हल्ला करणाऱ्याची हिंमत कमी कशी करणार?



- बहुतेक महिलांना असे वाटते की त्या एखाद्या पुरुषासमोर काय करू शकणार आहेत. अशा वेळी महिलांना विचारावे वाटते की, तुमच्या मुलीवर किंवा बहिणीवर हल्ला होत असेल किंवा तिची छेड काढली जात असेल तर तुम्ही मुकाट्याने पाहत राहणार आहात का?
- जेव्हा एखादी स्त्री दुसऱ्यांना मदत करण्यासाठी धावून जाऊ शकते मग ती स्वतःची मदत करतांना मागेपुढे का पाहते, संकोच का करते.

### *गुन्हेगाराला संधी मिळू देऊ नका.*

- गुन्हेगार नेहमी सोपे सावज शोधत असतो, जे त्याचे काम सहज होईल अशी खात्री देणारे असेल.
- जर त्याला वाटले की तुमच्या वाटेला जाणे सोपे नाही आणि तुम्ही विरोध करत दीर्घकाळ संघर्ष करू शकता, तर त्याला तुमच्यात स्वारस्य वाटणार नाही.

### *कृती करा.*

- मोठ्या आवेशाने केलेला विरोध, मग तो उसने अवसान आणून केलेला का असेना, चांगलाच प्रभावी असतो.
- मोठ्याने ओरडा, उर्मटपणे वागा, लाथा मारा, चावा घ्या, ओरखडे काढा, काहीही करून विरोध करा.
- डोळ्यावर आणि जांघेत फटके मारा.

**आपण काहीही करू शकत नाही असे समजून हार मानू नका.**

## दहावे सूत्र

# उपलब्ध गोष्टींचा वापर करा - तयार राहा



**संकटकाळी महिलांनी आजूबाजूला उपलब्ध कोणत्याही वस्तूचा वापर आपल्या बचावासाठी करावा.**

- **ढालीसारखे** - खुर्च्या, बॅग वापरा.
- **काठी सारखे** - छत्री, झाडू वापरा.
- **चाकुप्रमाणे** - पेन काटाचमचा, कात्रीचा वापर करा.
- **दगडा प्रमाणे** - पेपरवेट, फुलदाण्या, अन्य वस्तू वापरा.
- **डोळयात फेकण्यासाठी** - मध, वाळू, अत्तर फवारे, (परफ्यूम स्प्रेज) डिओडरंट वापरा.

जर तुम्ही संकटात सापडू शकाल अशी वेळ नेहमीच येऊ शकत असेल तर स्थानिक कायदे विचारात घेऊन काही सुरक्षा स्प्रे वगैरे जवळ बाळगा.

**स्वसंरक्षणासाठी काही प्रशिक्षण घ्या.**

# महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| **श्री. चंद्रकिशोर मिणा** (भापोसे)<br>वि.पो. महानिरीक्षक अमरावती परिक्षेत्र | ९४२३६९७३३३<br>ऑ. ०७२१ २६६३२२६ |
| **श्री. अरविंद चावरिया** (भापोसे)<br>पोलीस अधीक्षक बुलडाणा | ९९२३१०५५००<br>ऑ. २०१ २४२३९५ |
| **श्री. बजरंग बनसोडे**<br>अपोअ बुलडाणा | ८३०७१००१००<br>ऑ. ०७२६२ २४४९२५ |
| **श्री. हेमराजसिंह राजपूत**<br>अ.पो.अ. खामगाव | ९८२३१४४५५१<br>ऑ. ०७२६३ २५२०४८ |
| **श्री. पो.नि. ताथोड**<br>पो.उपअधिक्षक गृह प्रभारी चार्ज | ९९२२४३४५४८<br>ऑ. ०७२६२ २४२१०१ |
| **श्री. विलास यमावार**<br>उपविपोअ मेहकर | ९७६४६७०४९७<br>ऑ. ०७२६८ २२५९७५ |
| **श्री. अमोल कोळी**<br>उपविपोअ खामगाव | ७९७२२६२५३२<br>ऑ. ०७२६३ २२१६७ |
| **श्री. रमेश सुदाम बरकते**<br>उपविपोअ बुलडाणा | ७७७४९०९७७७<br>ऑ. ०७२६२ २४२३२६ |
| **श्री. डी.बी. तडवी**<br>उपविपोअ मलकापूर | ९९२३२४०४६६<br>ऑ. ०७२६७ २२२३६८ |
| **श्री. सुनिल सोनवणे**<br>उपविपोअ दे.राजा | ९८२३३४२१०६<br>ऑ. ०७२६१ २३१६५० |
| रिक्त - उपविपोअ आर्थिक गुन्हे शाखा | ऑ. ०७२६२ २४२७३८ |
| **सायबर पोलीस स्टेशन** | ०२७२६२ - २४७७६७ |
| महिला कक्ष भरोसा सेल<br>**श्रीमती अलका निकाळजे (एपीआय)** | ७०३८६९८२१८ |
| **महिला हेल्पलाईन** | ८६९८०००११ |
| **नियंत्रण कक्ष** | ०७२६२ २४२४०० |
| **स्थानिक गुन्हे शाखा (एल.सी.बी.)** | ०७२६२ २४२७३८ |
| **विशेष शाखा** | ०७२६२ २४१०४० |
| **बुलडाणा उपविभाग पोलीस स्टेशन** | |
| बुलडाणा शहर<br>**पोनि. श्री. पी.एस. साळुंके** | ०७२६२ २४२३२७<br>९८२३१७५९३९ |
| बुलडाणा ग्रामीण<br>**पोनि. श्री.एस.बी. नवलकर** (प्रभारी) | ०७२६२ २४१२५५<br>९८२३३०८०३० |

| | |
|---|---|
| धाड<br>**पोनि. दिनेश झांबरे** | ०७२६२ २६५१३२<br>९९२३२८९२४६ |
| अमडापूर<br>**सपोनि. अमित वानखेडे** | ०७२६४ २६४०३४<br>९८२३१३१४९४ |
| चिखली<br>**पोनि. गुलाबराव वाघ** | ०७२६४ २४२०६७<br>९०११३४३४४४ |
| बोराखेडी<br>**पोनि. श्री. एम.आर. गरुड** | ०७२६७ २४५२२६<br>७३५०३७४२८६ |
| धामणगाव बढे<br>**सपोनि. श्री. चंद्रकांत एस. ममताबादे** | ०७२६७ २४१५४१<br>९९२२२८९१७५ |
| रायपूर<br>**सपोनि. श्री. सुभाष दुधाळ** | ०७२६२ २७००३०<br>८८०६८४५९९९ |

## मलकापूर उपविभाग पोलीस स्टेशन

| | |
|---|---|
| मलकापूर शहर<br>**पोनि. श्री. प्रल्हाद काटकर** | ०७२६७ २२२०१८<br>९७६४३३०९०० |
| मलकापूर ग्रामीण<br>**पोनि. श्री. अनिल बेहरानी** | ०७२६७ २२२२५८<br>७०२०१६७६६३ |
| नांदुरा<br>**पोनि. श्री. एस. एच. नाईकनवरे** | ०७२६५ २२१०२८<br>९९२३२४७९८६ |
| जळगाव जामोद<br>**पोनि. श्री. सुनिल जाधव** | ०७२६६ २२१५३०<br>९४२३५३१३४३ |
| तामगाव<br>**पोनि. श्री. भुषण गावंडे** | ०७२६६ २३२२३२<br>९९२२८८०७८६ |
| एमआयडीसी<br>**पोनि. श्री. मिर्झा** | ०७२६७ २६२४००<br>८२०८०९२१९४ |
| सोनाळा<br>**सपोनि. श्री. अमर चौरे** | ०७२६६ २३८५३८<br>९८२३३१०६७१ |

## खामगाव उपविभाग पोलीस स्टेशन

| | |
|---|---|
| खामगाव शहर<br>**पोनि. श्री. सुनिल अंबुलकर** | ०७२६३ २५२०३८<br>९९२३४८१९४७ |
| खामगाव ग्रामीण<br>**पोनि. श्री. रफिक शेख** | ०७२६३ २५२२९५<br>९९२२७९९०२७ |

| | |
|---|---|
| शिवाजी नगर<br>**पोनि. श्री. सुनिल हुड** | ०७२६३ २५२१४२<br>९९२२९१२१३१ |
| पिंपळगाव राजा<br>**सपोनि. श्री. सचिन चव्हाण** | ०७२६३ २७१२३४<br>९०११३३४५८० |
| हिवरखेड<br>**सपोनि. श्री. प्रविण तळी** | ०७२६३ २६६६३६<br>८१७७९००१०० |
| जलंब<br>**सपोनि. श्री. शरद बांडे** | ०७२६५ २७७५४२<br>७७७४००९९१८ |
| शेगाव शहर<br>**पोनि. श्री. संतोष टाले** | ०७२६५ २५२०१०<br>७०२०५६३००३ |
| शेगाव ग्रामीण<br>**सपोनि. श्री. गोकुळे सुर्यवंशी** | ०७२६५ २५३०१०<br>९८२२२९९०२२ |
| **मेहकर उपविभाग पोलीस स्टेशन** | |
| मेहकर<br>**पोनि. श्री. आत्माराम प्रधान** | ०७२६८ २२४५३६<br>९१३०६६३३४७ |
| जानेफळ<br>**सपोनि. श्री. दिलीप मेसराम** | ०७२६८ २६२५३३<br>९७६३७००२३८ |
| डोणगाव<br>**सपोनि. श्री. दिपक पवार** | ०७२६८ २६६२४०<br>८८८८५१४१११ |
| लोणार<br>**पोनि. श्री. रविंद्र देशमुख** | ०७२६० २२१३२१<br>९८७०३३६२३७ |
| बिबी<br>**सपोनि. श्री. लहु तावरे** | ०७२६० २७१२५०<br>९९२२९०३२६३ |
| साखरखेर्डा<br>**सपोनि. श्री. जितेंद्र आडोळे** | ०७२६४ २६६०३८<br>९४०३१०९७२० |
| **देउळगाव उपविभाग पोलीस स्टेशन** | |
| देऊळगाव राजा<br>**पोनि. श्री. संभाजी पाटील** | ०७२६१ २३२००२<br>९९२३३१७०२७ |
| सिंदखेड राजा<br>**पोनि. श्री. जयवंत सातव** | ०७२६९ २३४२४४<br>७०२०२०७३६६ |
| किनगाव राजा<br>**सपोनि. श्री. सोमनाथ पवार** | ०७२६९ २६४४३३<br>७७४५०४५७५७ |
| अंढेरा<br>**सपोनि. श्री. राजवंत आठवले** | ०७२६१ २६५०३३<br>८८८८८२०४०३ |

# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

## बाल-विवाहमुळे होणारे गंभीर परिणाम टाळावेत





### बालविवाह प्रतिबंधक कायदा

- कायद्याने विवाहासाठी मुलीचे वय१८वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे ठरविलेले आहे. या पेक्षा कमी वयात लग्न केल्यास तो कायद्याने गुन्हा आहे.
- बालविवाहास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साह्य करणाऱ्यास ३ महिने कैद आणि दंडाची तरतूद आहे.
- वधू-वराचे पालक, विवाहास उपस्थित नातेवाईक, पौरोहित्य करणारे भटजी आणि वर हे सर्व जण बालविवाहात आरोपी ठरविले जातात. त्यांना ३ महिने कैद आणि दंडाची तरतूद आहे.
- मुलगा/मुलगी विवाहयोग्य होण्यासाठी शारीरिक व मानसिक वाढीची गरज असते. बाल वयात मुलीचे लग्न केल्यास तिला अनेक आरोग्यविषयक, शारीरिक व मानसिक सांसरिक समस्यांना तोंड द्यावे लागते.
- जागरूक व संवेदनशील नागरिकांनी गावात अथवा अन्य ठिकाणी बालविवाह होत असल्यास पोलिस ठाण्यात किंवा पोलिस अधीक्षक कार्यालयात संपर्क साधावा.
- बालविवाह रोखण्याची जबाबदारी आता शासनाने ग्रामसेवक व अंगणवाडी सेविकेंवरतीही सोपवलेली आहे.





# बुलडाणा जिल्हा पोलीस दल

## मुलीची जन्माआधी वा नंतर हत्या करू नका...

त्यांना प्रेमाने वाढवा.. त्या उद्याच्या
इंदिरा गांधी, झांसीची राणी, मदर तेरेसा,
कल्पना चावला असू शकतात....




मुद्रणस्थळ : ओंकार ग्राफिक्स ॲण्ड पब्लिकेशन जालना मो. ९८२२०७५०२६